डी. पी. भोसले कॉलेज
ग्रंथालय
कोरेगाव

# ग्रामीण बोली ही नागिणीचे दूध : बोधे

## डी. पी. भोसले महाविद्यालयाचे वार्षिक पारितोषिक वितरण

**पळशी, ता. १४ :** लोकांच्या ओठावरील भाषा बदलत असली, तरी अस्सल ग्रामीण बोलीचे महत्त्व कधीही कमी होणार नाही. इंग्रजी ही वाघिणीचे दूध असेल; पण ग्रामीण बोली ही नागिणीचे दूध आहे. त्यामुळे ग्रामीण बोलीभाषेतही यशाचे शिखर गाठता येते, हे विद्यार्थ्यांनी लक्षात ठेवावे, असे मत साहित्यिक प्रा. व. बा. बोधे यांनी व्यक्त केले.



**कोरेगाव : प्रा. व. बा. बोधे यांच्या हस्ते पारितोषिक स्वीकारताना पूजा जगताप. शेजारी डॉ. अरविंद बुरुंगले, डॉ. नानासाहेब गायकवाड, डॉ. विजय सावंत, शहाजी बर्गे आदी.**

कोरेगाव येथील डी. पी. भोसले महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेचे माजी सचिव प्राचार्य डॉ. अरविंद बुरुंगले होते. या वेळी स्थानिक व्यवस्थापन समितीचे सदस्य ज्ञानदेव भोसले, ॲड. प्रभाकर बर्गे, विजय बर्गे, शहाजी बर्गे, तुषार कदम, डॉ. शि. म. पंचादेवी, भाऊसाहेब नलावडे उपस्थित होते. डॉ. बुरुंगले, यशवंतराव चव्हाण शास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नानासाहेब गायकवाड यांनी मनोगत व्यक्त केले. प्राचार्य डॉ. विजय सावंत यांनी स्वागत, प्रास्ताविक केले. या वेळी विपुल इंगवले, पूजा जगताप यांच्यासह विविध विभागांत नैपुण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिकाने सन्मानित करण्यात आले. पीएचडी संपादन केल्याबद्दल प्रा. डॉ. विद्या नावडकर, प्रा. डॉ. दत्ताजीराव जाधव यांचा, राज्य मानवी हक्क आयोगाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल प्रा. डॉ. बाळासाहेब चव्हाण, तसेच प्रा. डॉ. रुस्तुम तांबोळी, प्रा. अर्पना जंगम, प्रशासकीय कुशल सेवेबद्दल अधीक्षक मारुती पवार, रामकृष्ण शिंदे, किशोर अनभुले यांचा सत्कार झाला.

उपप्राचार्य डॉ. दत्तात्रय गाताडे यांनी वार्षिक अहवालाचे, प्रा. बाळासाहेब भोसले यांनी जिमखाना विभागाचे, तर विद्यार्थी मंडळाची सचिव धनश्री जगदाळे हिने संदेश वाचन केले. प्रा. सौ. उज्ज्वला मदने, प्रा. सौ. पद्मिनी यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. श्रीमंत शिंदे यांनी आभार मानले.